जा.क्र./OW.No.२८५ /पोउआ/प्रकटीकरण /2021
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220
दिनांक/Date : ०३/03/2021

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month January – 2021 'उत्कृष्ट गुन्हे शोध'
व Best Conviction of the Month January – 2021
उत्कृष्ट अपराधसिद्धी पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी व उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे जानेवारी २०२१ करीता बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध व बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीताचे खालील शाखा/पोलीस ठाणे यांना देण्यात आलेले आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे जानेवारी – २०२१ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–३, (वरळी पोलीस ठाणे, गु.र.क्र. ४१८/२०२०), कलम ३०२ भा.द.वि.

**ब) माहे जानेवारी – २०२१ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–१०, गुप्रशा.,गुअवि. गु.र.क्र. ३६/२०१५, कलम ३२३, ३२६, ३६३, ३६६(अ), ३७६(२)(आय), ५०६ भादंवि सह ३, ४, ५ (आय), ६ लैंगिक अपराधांपासून बालकांचे सरंक्षण अधिनियम–२०१२, (आरे पोलीस ठाणे, गुरक्र. ००/१५ आणि सहार पो.ठाणे, गुरक्र. ७२/१५)

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध ( बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

दिनांक ०१/०३/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST DETECTION OF THE MONTH** " **माहे जानेवारी २०२१** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुन्हे शाखा प्रकटीकरण, कक्ष—०३ | वरळी पोलीस ठाणे ४१८/२०२० कलम ३०२, भादवि. |

—: ' अज्ञात कारणावरून खुन ':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमुद गुन्हयात दिनांक २३/१२/२० रोजी २३.२० वा. च्या पुर्वी वरळी पोलीस ठाणेच्या हद्दीतील पत्राची खोली, माया नगर, बिल्डींग नं ०३, अचानक नगर को ऑप हौ सो, बी जी खैर मार्ग, वरळी, मुंबई याठिकाणी आरोपी शिबु भौमिक याने महिला नामे श्रीमती शिखा नारायण मंडल उर्फ शिखा बिमल टिकादार मंडल, वय ४४ वर्ष हिला अज्ञात कारणावरुन गळा आवळुन तसेच कपाळावर व नाकावर बोथट हात्याराने मारुन जखमी करुन जीवे ठार मारले. म्हणुन फिर्यादी पोउनि प्रशांत पाटील, वरळी पो. ठाणे यांनी सरकारतर्फे फिर्यादी दिलेवरुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. प्रशांत नारायण पाटील वय —४१ वर्ष धंदा— नोकरी (पोलिस उपनिरीक्षक नेमणुक —वरळी पोलिस ठाणे मुंबई) |
| **बळीत** | :— | श्रीमती शिखा नारायण मंडल उर्फ शिखा बिमल टिकादार मंडल, वय ४४ वर्ष |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | शिबु सुधीर भौमिक, वय ४० वर्षे<br>दि. १२/०१/२०२१ रोजी |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हा घडल्यानंतर खुनाचा गंभीर गुन्हा असल्याने गांभिर्य लक्षात घेवुन, गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष — ३ मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्वरीत गुन्हयाचे ठिकाणी भेट देवून समांतर तपास सुरु केला. तपासामध्ये सदरची मयत महिला ही इसम नामे शिबु भौमिक याचे सोबत दोनच दिवसांपूर्वी राहावयास आली होती. त्यानंतर ती घराबाहेर आल्याचे शेजाऱ्यांनी पाहिलेले नव्हते. तसेच घटनास्थळी पोलीसांना मयत महिलेचे आधार कार्ड व शिबु भौमिक याचे कामाचे ओळखपत्र मिळून आले होते. यावरुन मयत महिलेची व तिचे सोबतच्या इसमाची ओळख पटली.शेजारील व्यक्तींकडे केलेल्या तपासात महिलेसोबतचा इसम फरार असल्याचे लक्षात आले.

गुन्हयाचे घटनास्थळ व त्या परिसराची पाहणी केली असता आरोपीने सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये येणार नाही याची योग्यती खबरदारी घेतली होती. तसेच आरोपी शिबु भौमिक याने स्वत:चे लोकेशन पोलीसांना शोधता येवू नये याकरीता स्वत:चा वापरता मोबाईल घटनास्थळीच ठेवून पळून गेला होता. अशाप्रकारे आरोपींने कोणताही दुवा मागे न ठेवता, अत्यंत योजनाबद्धरित्या गुन्हा केला असल्याने सदर गुन्हा उघडकीस आणण्यास अडचण होत होती.

गु.प्र.शाखा कक्ष—३ च्या तपासी पथकाने गुन्हयाचे घटनास्थळ, आजुबाजूचा परिसराची बारकाईने पाहणी करुन सीसीटिव्ही फुटेज व प्रत्यक्ष साक्षीदार मिळविण्याचे अनुषंगाने सखोल तपास सुरु केला. सदर आरोपी हा बंगाली असून तो त्याचे राहते गांव पश्चिम बंगाल येथे जाण्याची शक्यता लक्षात घेवून मुंबईतून पश्चिम बंगाल येथे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाडयांवर पथकामार्फत पाळत ठेवण्यात आली होती. परंतु आरोपीचा सुगावा लागेल अशी कोणतीही माहीती प्राप्त होत नव्हती. मानवी कौशल्याच्या आधारे आरोपीचा शोध घेत असताना सदरचा आरोपी कर्नाटक व महाराष्ट्र राज्यामध्ये वेगवेगवळया ठिकाणी अस्तित्व लपवून राहत

असल्याची माहीती मिळाली.

सदर प्राप्त माहीतीच्या अनुषंगाने सतत पाठपुरावा करीत असताना आरोपी पुणे येथे असल्याची माहीती मिळून आली. त्यानुसार नमूद पथकाने पुणे येथे सुमारे एक आठवडा दिवस/रात्र पाळत ठेवून तांत्रिक बाबींची वारंवार पडताळणी करुन दिनांक १२/०१/२०२१ रोजी आरोपी शिबु भौमिक हा रिक्षाने पळून जात असताना पुणे येथून शिताफीने अटक केली.

गुन्हयाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये कौटूंबिक वादातून आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. अशाप्रकारे गु.प्र.शाखा कक्ष—३ च्या तपासी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी अहोरात्र मेहनत घेवुन, कौशल्याने व चातुर्याने गुन्हयातील आरोपीची माहिती प्राप्त करुन, सदर आरोपी गुन्हा केल्यानंतर त्याचे मोबाईल फोन बंद करुन महाराष्ट्र, कर्नाटक, पुणे, या परिसरात फिरत होता. त्यास शिताफिने अटक करुन खुनाचा गंभीर गुन्हा उघडकिस आणला.

गुन्हे शाखा प्रकटीकरण, कक्ष—०३ तपास पथकातील अधिकारी/अंमलदाराचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उप निरीक्षक | मोहसिन सिराज पठाण | प्रशस्तीपत्रक |
| २ | पो.शि.क्र.०६.१९३४ | भास्कर भिमराव गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ना.क्र.०३.२०८ | आकाश आप्पासो मांगले | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र.०४.१०१० | वैभव विश्वनाथ बिडवे | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक ०१/०३/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST CONVICTION OF THE MONTH** " **माहे जानेवारी —२०२१** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जानेवारी — २०२१

| | | |
|---|---|---|
| **०१** | **गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—१०** | **अल्पवयीन मुलीचे अपहरण करून लैंगिक अत्याचार**<br>गुप्रशा.,गुअवि. गु.र.क्र. ३६/२०१५, कलम ३२३, ३२६, ३६३, ३६६(अ), ३७६(२)(आय), ५०६ भादंवि सह ३, ४, ५ (आय), ६ लैंगिक अपराधांपासून बालकांचे सरंक्षण अधिनियम—२०१२, (आरे पोलीस ठाणे, गुरक्र. ००/१५ आणि सहार पो.ठाणे, गुरक्र. ७२/१५) |

—: **अल्पवयीन मुलीचे अपहरण करून लैंगिक अत्याचार** :—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— दिनांक ०१/०३/२०१५ रोजी २२.०० वा. चे सुमारास जे. डी. मैदान, मरोळ पाईप लाईन, सहार, अंधेरी पूर्व, मुंबई या ठिकाणावरुन गुन्हयातील बळीत मुलगी कुमारी अनामिका सुरेंद्र गुप्ता, वय ५ वर्षे ही दुधाची पिशवी घेवुन तिचे घरी पायी जात असताना आरोपी शिवकुमार उर्फ शिवा रामलखन राणा, वय ३० वर्षे याने तिला तो चालवित असलेल्या पिवळया हुडची भाडोत्री ऑटो रिक्षा क्र. एमएच—०२—टीए—७९३० मध्ये 'मैं तुम्हारे पिताजी को पहचानता हूँ, मैं तुम्हे घर छोडता हुँ' असे खोटे सांगुन तिला धमकावुन जबरीने रिक्षात पुढे बसवुन फिर्यादी श्री. सुरेंद्र गुप्ता यांचे कायदेशीर रखवालीतून तिचेवर लैंगिक अत्याचार करण्याच्या उद्देशाने पळवुन नेले.

त्यानंतर बळीत मुलीला आरे कॉलनी परिसरातील जंगलात नेवुन २२.३० ते २३.०० वा. चे दरम्यान नमूद ऑटो रिक्षाचे पाठीमागील सीटवर बळीत मुलीला मारहाण करुन तिचे कपडे काढुन, तिच्या गुप्तांगाला चावा घेतला, तसेच तिचेशी जबरी संभोग केला आणि बळीत मुलीला तिच्या गुप्तांगाला अत्यंत वेदनादायी अशा गंभीर स्वरुपाच्या दुखापती केल्या. म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. सुरेंद्र नंदलाल गुप्ता, वय ३० वर्षे, |
| बळीत/मयत | :— | कुमारी अनामिका सुरेंद्र गुप्ता वय ५ वर्षे, (फिर्यादींची मुलगी) |
| आरोपी अटक व दिनांक | :— | शिवकुमार उर्फ शिवा रामलखन राणा, वय ३० वर्षे<br>दिनांक १०/०३/२०१५ |
| निकाल दिनांक | :— | २१/०१/२०२१ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | १) पोक्सो अधिनियम कलम ६ अन्वये सक्त मजूरीसह आजन्म कैद व रू. ४० हजार दंड व दंड न भरल्यास सक्त मजूरीसह ६ महिने कैद,<br>२) भादंविसं. कलम ३६३ अन्वये सक्त मजूरीसह ५ वर्षे, कैद व रू. ७ हजार दंड व दंड न भरल्यास सक्त मजूरीसह ३ महिने कैद,<br>३) कलम ३२३ अन्वये सक्त मजूरीसह १ वर्षे, कैद व रू. १ हजार दंड व दंड न भरल्यास सक्त मजूरीसह १ महिना कैद,<br>४) कलम ५०६ अन्वये सक्त मजूरीसह २ वर्षे, कैद व रू. २ हजार दंड व दंड न भरल्यास सक्त मजूरीसह १ महिना कैद, |

**तपास कौशल्य** :— वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती गोपिका जहागिरदार, (सध्या सपोआ) आणि कक्षातील तत्कालीन आणि वर्तमान पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी गुन्हा नोंद झाल्यानंतर सातत्याने रिक्षाचे जुजबी वर्णनावरून सुमारे १५० पेक्षा जास्त रिक्षांची तपासणी केली. गुन्हयाचा तपास करुन दि. १०/०३/२०१५ रोजी आरोपीस रिक्षासह ताब्यात घेवून अटक केली. आरोपीविरुध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र सादर केले. तसेच यातील साक्षीदार व पंच यांना मा. न्यायालयाच्या सुनावणी तारखेस वेळोवेळी हजर करुन मा.न्यायालयात साक्षीदार यांनी सरकार पक्षातर्फे समर्थपणे साक्ष दिल्याने आरोपीविरूध्द दोषसिध्द होवून आरोपी शिवकुमार उर्फ शिवा रामलखन राणा, वय ३० वर्षे यास वर नमद प्रमाणे शिक्षा झालेली आहे.

## गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–१०, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्रभारी पोलीस निरीक्षक | विनय घोरपडे, | प्रशस्तीपत्रक |
| २ | तपासी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक | गोपिका शेषदास जहागिरदार (सध्या सपोआ) | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पैरवी अधिकारी | सपोनि.वाहीद अ. पठाण, | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोहले.२७७२० | मोहन जा. घाणेकर | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोहक्र.२९८२५, | कल्याण नि. बाबर | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोहक्र. ३०७४१, | चंद्रकांत गो. गवेकर, | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोना.०३१०९, | अजित द. पाटील | प्रशस्तीपत्रक |